| नाशिक महानगरपालिका नाशिक<br>विविधकर विभाग | |
|---|---|
| **परीपत्रक स्वरूप** | सार्वजनिक उत्सवांच्या प्रसंगी रस्त्यावर/सार्वजनिक ठिकाणी मंडप /स्टेज /कमान वगैरे तात्पुरते उभारण्यास परवानगी देणे बाबत कार्यपध्दती. |
| **परीपत्रक क्रमांक** | जा.क्र.म.का./विविधकर/कक्ष-१/२०९/२०१६ दि. ११/०८/२०१६ |
| **कोणाच्या माहितीसाठी** | मा.जिल्हाधिकारी नाशिक, मा. पोलिस आयुक्त, नाशिक शहर, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपानी नाशिक शहर, सर्व विभाग प्रमुख मनपा, सर्व विभागीय अधिकारी, मनपा, सार्वजनिक मंडळे / नागरीक /संस्था इ. |
| **संदर्भ** | १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २३४ व ४५८ अन्वये.<br>२. मा उच्च न्यायालय जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० सोबत सिव्हील ॲप्लिकेशन १२४/२१०४ मध्ये दिनांक १३ मार्च, २०१५ व दिनांक २४ जून, २०१५ रोजीचा निर्णय.<br>३. महाराष्ट्र शासन (नगरविकास विभाग), शासन परिपत्रक क्रमांक याचिका २०१५/सं.क्र. ८७८(१)/नवि ३४ दिनांक ६ जुलै, २०१५<br>४. महाराष्ट्र शासन (नगरविकास विभाग), शासन परिपत्रक क्रमांक याचिका २०१५/सं.क्र. ८७८(२)/नवि ३४ दिनांक ६ जुलै, २०१५, ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००.<br>५. मा.महासभा ठराव क्र.६९३ दि.१७/१०/२०१५ |

**प्रस्तावना**

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात गणपती व नवरात्रौत्सव, रमझान महिना, बकरी ईद, रमझान ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन), (शिवजयंती) व सर्व धर्मीय उत्सव, सण रस्त्यांवर साजरे केले जातात. या उत्सवा दरम्यान मोठया प्रमाणात मंडप उभारण्यासाठी विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३४ अन्वये मा.पोलिस आयुक्त यांच्या सहमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्या वेळी बहुतेक मंडळे ही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावरच मंडप उभारणी करतात, अशावेळी परिसरात असलेल्या नागरिकांना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक उत्सवामध्ये तात्पुरत्या स्वरुपात बांधलेल्या मंडपाचा अडथळा होऊ नये. तसेच सार्वजनिक उत्सवही साजरे करता यावेत व परिसरातील नागरिक व रहदारीला कमीत कमी त्रास व्हावा या दृष्टीकोनातून मा. उच्च न्यायालयाचे दिनांक १३ मार्च, २०१५ व दिनांक २४ जून, २०१५ रोजीचे सविस्तर आदेश तसेच शासन निर्णय दिनांक ६ जुलै, २०१५ अन्वये निर्देशित केलेले मार्गदर्शक तत्वानुसार नाशिक महानगरपालिकेच्या भौगोलिक दृष्टीकोनातुन नाशिक महानगरपालिका हद्दीतील सण साजरे करताना पर्यावरणाचा -हास होणार नाही, ध्वनी प्रदुषण होणार नाही व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही. मा. उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे दिशा निर्देश सार्वजनिक मंडळाकडून उचित पालन होण्यासाठी, नाशिक महानगरपालिकेतर्फे जनभावनांचा मान राखून आणि जनजीवन विस्कळीत होऊ न देता जनहितार्थ मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आलेली आहे. सदर मार्गदर्शक तत्वानुसार खालिल अटीशर्ती नुसार सार्वजनिक उत्सवा प्रसंगी रस्त्यावर मंडप उभारण्यास परवानगी देण्यात यावी.

१. सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी रस्ता/सार्वजनिक ठिकाणी मंडप/स्टेज. उभारण्यास परवानगी मिळणेबाबत संबंधित मंडळाने विहित नमुन्यात सार्वजनिक उत्सवाच्या ३० दिवस अगोदर संबंधीत विभागीय कार्यालयात विभागीय अधिकारी यांचेकडे अर्ज करणे बंधनकारक आहे.

२. संबंधित विभागीय कार्यालयात विभागीय अधिकारी यांनी त्यांचेकडील कार्यकारी अभियंता/उप अभियंता यांचेमार्फत जागेची पाहणी करुन वाहतुकीस किमान १/३ रस्ता उपलब्ध होईल अशाप्रकारे मंडप उभारणेत यावा व कोणत्याही सोसायटीस अथवा मिळकत धारकांच्या जाण्यायेण्याच्या रस्त्याच्या आड येणार नाही अशाप्रकारे संबंधित अर्जदाराकडून मंडप उभारणेची लांबी रुंदी निश्चित करण्यात यावी.

३. मंडप, स्टेज, डेकोरेशनची सर्व जबाबदारी ना हरकत प्राप्त करुन घेणाऱ्या संस्थेची/व्यक्तीची राहील. मंडप उभारण्यापासून उत्सव पूर्ण होईपर्यंत व मंडप काढण्यापर्यंत कोणताही अपघात झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

४. मंडप, स्टेज, डेकोरेशन उभारण्यासाठी मागणी केलेल्या संस्थेने /व्यक्तीने संस्थेवरील सर्व पदाधिकारी यांची नावे पत्ता व संपर्क दूरध्वनीसोबत देणे आवश्यक आहे व किमान एक पदाधिकारी चोवीस तास मंडपात राहील अशी व्यवस्था करणे बंधनकारक.

५. संबंधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी रस्त्याच्या १/४ भागापेक्षा अधिक असणार नाही व सार्वजनिक वाहतुकीस अडथळा येणार नाही व नागरिकांना त्यापासुन उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही याची दक्षता संबंधित मंडळाने घ्यावयाची आहे. मंडप/स्टेज इ. उभारणेकरिता आकारमानाचा तक्ता खालीलप्रमाणे :-

| रत्याची रुंदी | ज्या साठी दिली पाहिजे अशी कमाल रुंदी | खुली असली पाहिजे अशी रस्त्याची रुंदी |
|---|---|---|
| २५ फुट | ६.२५ फुट | १८.७५ फुट |
| ५० फुट | १२.५० फुट | ३७.५० फुट |
| ७० फुट | १७.५० फुट | ५२.५० फुट |

६. संबधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देणेपूर्वी शहर वाहतूक पोलीस शाखा, स्थानिक पोलीस स्टेशन व महानगरपालिकेच्या अग्निशमन विभाग यांचे ना हरकत दाखला तीन दिवसांचे आत सादर करणे बंधनकारक आहे.

७. ज्या प्रस्तावित मंडप उभारणीच्या जागा ही बस/अवजड वाहन मार्गावर असेल. त्या रस्त्यावर मंडप उभारणेकरीता परवानगी देतांना संबंधित विभागीय अधिकारी यांनी त्यांचेकडील कार्यकारी अभियंता/उप अभियंता यांचेमार्फत जागेची पाहणी करुन बस/अवजड वाहना करीता, रिक्षा करीता व सार्वजनिक वाहतुकितील वाहनांकरीता उपलब्ध राहील याची खात्री करुनच मंडप उभारणेची जागेची रुंदी निश्चित करणेत येईल.

८. मंडप उभारणी ही रोड जंक्शनपासून किमान रस्त्याच्या रुंदीच्या १/४ याप्रमाणे जंक्शनपासून लांब राहील जेणेकरुन वाहने वळविणे सोपे होईल अशापध्दतीने मंडप जागा निश्चित करणेत यावी.

९. ज्या ठिकाणी पक्क्या स्वरुपाचे रस्ते दुभाजक आहेत, अशाठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भागातील अशा कोणत्याही रस्त्यावर एकूण रस्त्याच्या रुंदीपेक्षा (फूटपाथ वगळून) १/४ पेक्षा जास्त रुंदीच्या मंडपाची उभारणी करता येणार नाही.

१०. कोणत्याही परिस्थितीत आठ फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप उभारणी करीता परवानगी देता येणार नाही व मंडपाचे अंतर विद्युत तार व डिपी बॉक्सपेक्षा सहा फुट अंतरावर ठेवणे बंधनकारक आहे.

११. सिमेंट कॉक्रिट/डांबरी रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर मंडपासाठी खोदाई करण्यास परवानगी देता येणार नाही अशाठिकाणी मंडप उभारवयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडपाकरीता आवश्यक असणारे खांब रोवण्यात यावेत अथवा पूर्वनियोजित व्यवस्थापनेप्रमाणे मंडपाकरीता खांब रोवण्यात यावेत.

अ) असे खड्डे खोदल्याचे आढळल्यास प्रती खड्डा रुपये ५० हजार इतका दंड लावावा. सदर दंड खड्डयाचा आकार १ फुट बाय १ फुट किंवा त्यापेक्षा कमी असल्यास लागेल. त्यापेक्षा अधिक आकाराच्या खड्डयाला सरफेस क्षेत्रफळानुसार प्रती चौ.फुट रुपये ५० हजार दंड असा राहिल.

ब) सदर दंड भरण्यासाठी परवानगी देतांना संबंधित अर्जदाराच्या/मंडळाच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने खड्डे खोदल्यास व दंड न भरल्यास मी व्यक्तीश: सदर दंड भरण्याची हमी देत आहे. व तो दंड मी न भरल्यास माझ्याकडून जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसूल करण्यास महानगरपालिकेला परवानगी देत आहे असे शपथ पत्र देणे बंधनकारक राहिल.

१२. उत्सवाकरीता लागणारे विद्युत कनेक्शन कोणत्याही परिस्थितीत महापालिकेच्या रस्त्यावरील विजेच्या दिव्यातून घेता येणार नही असे केल्यास दुर्घटना होण्याची, केबल जळण्याचे व रस्त्यावरील सर्व दिवे बंद पडण्याची दाट शक्यता असते. उत्सवाकरीता महापालिकेच्या विदयुतपोलवरुन जोडणी घेण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करुन नजीकच्या पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करणे बाबत कार्यवाही करुन, परवानगी रद्द करण्यात येईल. उत्सवाकरीता लागणारे विद्युत कनेक्शन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचेकडुन घेणे मंडपधारकास बंधनकारक राहील त्यासाठी आवश्यक असलेला ना-हरकत दाखला महानगरपालिकेमार्फत देणेत येईल.

१३. संबंधित मंडळाला/स्थंस्थेला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासून जास्तीत जास्ती १५ मीटर अंतरापर्यंतच विद्युत रोषणाई करता येईल.

१४. रस्त्याच्या फुटपाथवर मंडप उभारणीस परवानगी देता येणार नाही.

१५. पर्यावरण विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.ईएनव्ही-२०१०/प्र.क्र.१०६/ता.क.३ दि.३-५-२०११ अन्वये दिलेल्या निर्देशांप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरे करणारी मंडळे यांचेकडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

१६. महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग,वन विभाग,नगर विकास विभाग व इतर विभागांनी वेळोवेळी पारित केलेल्या शासन निर्णय व मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्य न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन संबंधित मंडळांनी करणे बंधनकारक आहे.

१७. मागील वर्षी ज्या आकाराचे मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात आली होती. तेवढयाच आकाराचा किंवा रस्त्याच्या १/४ भाग यापैकी जे कमी असेल त्या आकाराचा मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात येईल. नाशिक महानगनपालिका आवश्यकतेनुसार मंडप/उभारण्याची परवानगी दयावी किंवा नाही याबाबत स्वेच्छाधिकार अबाधित ठेवत आहे. तसेच मंडप/स्टेज आकार कमी करण्याचे निर्देशसुध्दा मंडळांना देऊ शकते ते मंडळांवर बंधनकारक राहील.

१८. महानगरपालिकेने परवानगीत दिलेल्या आकारमान व साईज नुसार मंडप/स्टेज इ. प्रमाणे उभारणी करणे संबंधित मंडळावर बंधनकारक आहे. परवानगी पेक्षा जास्त अढळून आलेल्या आकारमानातील मंडप/स्टेज इ. संबंधीत विभागीय अधिकारी यांनी पोलीस अधिकाऱ्यांच्या मदतीने काढुन टाकण्यात येईल व संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

१९. रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य तात्पुरते बांधकामाबाबत होणाऱ्या उपद्रवाबाबत नागरिकांना त्रास होणार नाही व रहदारीस अडथळा येणार नाही याबाबत संबंधीत मंडळांनी दक्षता घेणे बंधनकारक आहे.

२०. सार्वजनिक ठिकाणी असलेल्या ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे निर्माल्य कलशात साठवून त्यात दैनंदिन पूजेसाठी वापरलेली सामुग्री जमा करून त्याची आरोग्य विभागाकडुन योग्य ती विल्हेवाट लावावी. निर्माल्य कलशात प्लास्टिक फुले, माळा यांसारखी अविघटनशील सामुग्री जाणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

२१. आगप्रतिबंधक उपाय योजना करणे व आग लागू नये यासंबंधी करावयाच्या खबरदारीचे सूचना फलक लावणे बंधनकारक राहील.

२२. नाशिक महानगरपालिका हद्दीतील रस्ता /सार्वजनिक ठिकाणी उत्सव,सण,धार्मिक कार्यक्रम तसेच वैयक्तिक कारणांसाठी मंडप/स्टेज उभारणेसाठी यापुर्वी मा.महासभेने व मा. स्थायी समितीने पारित केलेल्या ठारावाप्रमाणे आवश्यक शुल्काची वसुली मंडळाकंडुन करण्यात येईल.

२३. सार्वजनिक रस्ते तात्पुरते वापरण्यासाठी किंवा त्यावर मंडप/स्टेज उभारणी करण्यासाठी सर्वसामान्यपणे खाजगी उत्सव किंवा समारंभ यांचेबाबतीत पाच दिवस किंवा सार्वजनिक उत्सव किंवा समारंभ यांच्या बाबतीत पंधरा दिवस त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

२४. बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी ध्वनी प्रदुषण करणारी उपकरणे / स्त्रोत जसे D.G Sets, Generator Sets, इमारतीसाठी वापरण्यात येणाऱ्या सुविधा,घरगुती उपकरणे इत्यादींची सभोवतालच्या हवेतील ध्वनी प्रदुषण गुणवत्ता खाली नमुद केल्याप्रमाणे असेल.

- **आवाजाच्या संबधीत सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा.**

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्र / झोन प्रवर्ग | डेबि(ए) एल ईक्यू मधील मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | दिवसा | रात्री |
| (अ) | औदयोगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| (ब) | वाणिज्यिक क्षेत्र | ६५ | ५५ |
| (क) | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| (ड) | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

**वेळेचा कालावधी:-**

१. दिवसा म्हणजे सकाळी ६.०० ते रात्री १०.०० पर्यंत
२. रात्री म्हणजे १०.०० ते सकाळी ६.०० पर्यंत
३. शांतता क्षेत्र म्हणजे रुग्णालये, शैक्षणिक संस्था,न्यायालये,धार्मिक ठिकाणे किंवा समक्ष प्राधिकरणाने अशी क्षेत्रे म्हणुन घोषित केलेली इतर कोणतीही क्षेत्रे यांच्या सभोवतालच्या १०० मीटरपर्यंतच्या क्षेत्राचा समावेश असलेली क्षेत्र.

२५. ध्वनी प्रदुषणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र रजिस्टरची व्यवस्था करणे व प्राप्त झालेली ध्वनी प्रदूषणाची तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस स्टेशनला व पोलीस कंट्रोल रुमला अग्रेषीत करण्यात यावे.

२६. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नाशिक महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवाच्यावेळी अनाधिकृतरित्या उभारलेल्या मंडपाबाबत तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत,नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली आपत्कालिन विभागाची /तक्रार निवारण कक्षाचे टोल फ्री नंबर, ई-मेल सुविधा, एस.एम.एस सुविधा उपलब्ध करुन त्यास उचित प्रसिध्दी देण्यात यावी.

वरील प्रमाणे तसेच मा.न्यायालयाच्या व शासनाच्या मार्गदर्शन सुचना व अटी शर्तीचा भंग केल्यास त्यांच्या परवानग्या रदद करुन अशा मंडळांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.
सदरचा आदेश नागरीक व मंडळे यांना माहिती करीता मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.

Sd/-
**आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**